# देवगिरी नागरी सहकारी बँक लि. औरंगाबाद

मुख्य कार्यालय, अर्थ कॉम्प्लेक्स, केसरसिंगपूरा,
औरंगाबाद - ४३१ ००१. (महाराष्ट्र)

संहति:कार्य साधिका

अनुक्रमांक -

दिनांक :- / / २०

कृपया अर्ज भरण्यापूर्वी मागील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

## ए.टी.एम. कार्ड साठी अर्ज

अलीकडच्या काळातील पासपोर्ट साईज रंगीत फोटो येथे चिकटवावा.

प्रति,
मा. शाखाधिकारी
______________________ शाखा,

महोदय,
माझे / आमचे आपल्या शाखेत खाली नमूद केल्याप्रमाणे खाते असून, आम्ही आपल्या बँकेच्या ए.टी.एम. सेवेचा लाभ घेऊ इच्छितो.
(खातेदाराचे नाव प्रथम आडनाव)

कृपया मला/आम्हाला पुढील नावाने ए.टी.एम. कार्ड देण्यात यावे ही विनंती. कार्डावर ज्याप्रमाणे नांव लिहून हवे तसे नांव इंग्रजीत लिहावे.

अर्जदाराच्या आईचे माहेरचे पूर्ण नाव

| शाखा कोड | मोड्युल | योजना | खाते क्रमांक | दिनांक :- ____________ रोजीची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**१.** पत्ता-निवासस्थान :- ______________________

दूरध्वनी क्र. ______________ मोबाईल क्र. ______________

ई-मेल : ______________

कृपया अशी (✓) खूण करावी.

**२. पुरुष** ☐ **स्त्री** ☐ **३. जन्मतारीख** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ **वय** ________ **वर्षे**

**४. व्यवसाय (✓ खूण करावी)**

अ) स्वयं रोजगार ब) नोकरी (सरकारी/निमसरकारी/खाजगी)

क) व्यापार ड) इतर (प्रकार नमुद करावा)

**५. पत्ता - कार्यालय** ______________________

दूरध्वनी क्र. : ______________

**६. उत्पन्न रु. :-** **(मासिक/वार्षिक)** **७. पॅन क्रमांक :**

मी / आम्ही असे जाहीर करतो की, वर नमूद केलेली सर्व माहिती खरी आहे. यात बदल झाल्यास तशी पूर्व सूचना बँकेस देईन.
ए.टी.एम. कार्ड बाबतचे सर्व नियम मी/आम्ही वाचले असून मला/आम्हाला ते मान्य आहेत.

| खातेदाराचे नाव | स्वाक्षरी (बँकेतील नमुन्याप्रमाणे) | |
|---|---|---|
| १. | १) | २) |
| २. | | |
| ३. | ३) | ४) |
| ४. | | |

(सूचना :-स्वाक्षरी चौकोनातच करावी.)

१) संयुक्त खात्यांबाबत सर्व खातेदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक.
२) वरील सर्व माहिती भरणे आवश्यक.
३) संयुक्त खात्याबाबत खाते व्यवहार संयुक्तपणे (Jointly) असल्यास ए.टी.एम. सुविधा मिळणार नाही.

**शाखेच्या उपयोगासाठी**

कृपया अशी ✓ खूण करावी.

१) अधिकारपत्र घेतले आहे. ☐

२) अर्ज तपासला आहे (**KYC** प्रमाणे) ☐

३) **SMS** नोंदणीकरण केले आहे ☐

ए.टी.एम. कार्ड देण्यास्तव शाखेची शिफारस आहे.

सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊन जोडण्यात आलेली आहेत.

दिनांक :-

**प्राधिकृत अधिकारी**

**कार्ड ऑथरायझेशन**

ए.टी.एम. कार्ड क्रमांक :- ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

तपशीलाची संगणकांत नोंद केली आहे.

पिन मेलर कार्यवाही पूर्ण. ☐ / अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्यास्तव शाखेस परत ☐

**प्राधिकृत अधिकारी (ए.टी.एम)**

# अर्ज भरण्यासाठी सूचना

१. नावां व्यतिरिक्त अन्य सर्व मजकूर मराठी किंवा इंग्रजी भाषेत लिहिला तरी चालेल. (नांव इंग्रजी भाषेत व कॅपीटल अक्षरातच लिहावे.)

२. शाखेत असलेल्या नोंदीप्रमाणे नांव इंग्रजी कॅपिटल अक्षरात पुढीलप्रमाणे लिहावे. (आडनांव / नांव / वडीलांचे किंवा पतीचे नांव) प्रत्येक नावांनंतर एक चौकोन रिक्त सोडावा.

**उदा.**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| X | X | X | X | X | | X | X | X | X | X | X | X | X | | X | X | X | X | X | X |

३. सेव्हिंग / चालू खात्याचा क्रमांक लिहितांना संगणकीकृत पासबुकावर नमूद केल्याप्रमाणे पंधरा आकडी क्रमांक लिहावा.

**उदा.**

| **शाखा कोड** | | | | **मोड्युल** | | **योजना** | | | **खाते क्रमांक** | | | | | | **दिनांक :<br>रोजीची शिल्लक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| X | X | X | X | X | X | X | X | X | X | X | X | X | X | X | |
| **शाखा - क्रांती चौक** | | | | **बचत** | | **वैयक्तीक** | | | | | | | | | |

४. पत्ता लिहितांना पोस्टाने / कुरिअर द्वारे पत्र पाठविण्यासाठी आवश्यक / पुरेसा पत्ता लिहावा. ज्यात घर नं. / घराचे नांव / फ्लॅटचे नांव / प्लॉट क्र. / गल्ली नं. / रस्त्याचे नांव / भागाचे नांव / शहराचे नांव / तालुका व जिल्हा इत्यादी लिहावा.

५. कार्यालयीन उपयोगासाठी असलेल्या जागेत काहीही लिहू नये.

६. पॅन कार्ड धारकांनी पॅन क्रमांक नमूद करणे गरजेचे आहे. पॅन कार्ड धारण केलेले असतांना क्रमांक नमूद न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

७. वय नमूद करतांना अर्जाचे दिनांकास पूर्ण झालेल्या वर्षात लिहावे. चालू वर्षात लिहू नये.

८. अर्ज भरतांना काही शंका असल्यास शाखेतील कर्मचारी / अधिकारी यांचे मार्गदर्शन घ्यावे.

# देवगिरी नागरी सहकारी बँक लि. औरंगाबाद

**अधिकारपत्र**

**(ए.टी.एम. कार्डसाठी अर्जकर्त्यांने लिहून द्यावयाचे)**

प्रति,
मा. शाखाधिकारी,
देवगिरी नागरी सहकारी बँक लि.,
________________ शाखा,
औरंगाबाद.

**विषय :- ए.टी.एम. कार्ड मिळणे बाबत.**

महोदय,

मी/आम्ही आपल्या बँकेचे ए.टी.एम. कार्ड मिळण्यासाठी अर्ज केला आहे. आपण मला/आम्हाला ए.टी.एम. कार्ड दिल्यास एटीएम कार्ड बाबतच्या बँकेने ठरवून दिलेल्या पुढील अटी आणि शर्ती मला/आम्हास मान्य आहेत.

१) एटीएम कार्ड ही बँकेची मालमत्ता असून बँकेने मागणी केल्यास त्वरीत कोणत्याही अटी व शर्ती न घालता कार्ड बँकेस परत दिले जाईल.

२) एटीएम कार्ड हे माझ्या/आमच्या व्यक्तिगत उपयोगासाठी देण्यात आले आहे. हे कार्ड अहस्तांतरणीय (Non Transferable) आहे हे मला / आम्हाला माहित आहे.

३) एटीएम कार्ड हरवले किंवा चोरीस गेले तर मी/आम्ही त्याची सूचना त्वरीत बँकेस लेखी देईन/देऊत.

४) मी/आम्ही बँकेने दिलेल्या माझ्या/आमच्या पिनची गोपनीय माहिती इतरांना देणार नाही. पिन/एटीएमच्या गैरवापरामुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी माझी/आमची असेल. त्यासाठी बँकेची जबाबदारी असणार नाही याची मला/आम्हाला संपूर्ण जाणीव आहे.

५) मी/आम्ही एटीएम कार्डमार्फत होणाऱ्या व्यवहारासाठी माझ्या/आमच्या खात्याला वेळोवेळी रक्कम नांवे टाकण्याची अनुमती देत आहे/आहोत. यांत पैसे काढणे/वर्ग करणे यासाठीही संमती राहील.

६) मी/आम्ही अशी हमी देतो की, बँकेने ठरवून दिल्याप्रमाणे खात्यावर किमान शिल्लक रक्कम नेहमी उपलब्ध राहील. तसेच याद्वारे मी/आम्ही एटीएम कार्ड चे चार्जेस करासहीत वेळोवेळी नांवे टाकण्याची संमती देत असून सदर चार्जेसची रक्कम खात्यावर शिल्लक राहील याची मी / आम्ही हमी देत आहोत.

७) एटीएम मध्ये झालेले सर्व व्यवहार माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक असतील. एटीएम व्यवहार करतांना होणाऱ्या व्यवहाराची तसेच बँकेच्या संगणकीकृत रेकॉर्ड प्रमाणे होणाऱ्या नोंदीची, रकमेची माझी/आमची जबाबदारी राहील.

८) एटीएम कार्डद्वारे व्यवहार करण्यासाठी/चार्जेससाठी वर नमूद केल्याप्रमाणे पुरेशी रक्कम शिल्लक ठेवण्याची जबाबदारी मला/आम्हाला मान्य आहे.

९) एटीएम मार्फत झालेल्या व्यवहारांची माहिती बँकेकडून घेताना झालेल्या व्यवहाराबाबत एटीएम ट्रान्सॅक्शन स्लीप देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील.

१०) माझे/आमचे खाते बंद करतांना एटीएम कार्ड बँकेला परत करण्याची जबाबदारी मला/आम्हाला मान्य आहे. खाते बंद करण्याची लेखी सूचना बँकेला दहा दिवस आधी करण्याची माझी/आमची तयारी आहे.

११) एटीएम कार्ड पांच वर्षाचे मुदतीसाठी आहे. पांच वर्षानंतर त्याचे वेळेत नुतनीकरण करून घेण्याची माझी/आमची जबाबदारी राहील. वेळेत नुतनीकरण करून न घेतल्यास कार्डावरील व्यवहार बँकेतर्फे थांबविण्यात येतील याची जाणीव असून मला/आम्हाला ते मान्य आहे.

१२) एटीएम कार्डाबाबतचे नियम कोणत्याही कारणास्तव पूर्व सूचनेशिवाय वेळोवेळी बदलण्याचा/सुधारण्याचा बँकेला पूर्ण अधिकार राहील व ते माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील. याची मला / आम्हाला जाणीव आहे.

१३) बँकेला योग्य कारण वाटल्यास बँक एटीएम कार्डाचा वापर एकतर्फी थांबवू शकेल. यासाठी माझी/आमची कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही.

१४) एटीएम कार्ड च्या गैरवापरामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीसाठी बँक जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारच्या गैरवापरामुळे बँकेचे काही नुकसान झाल्यास ते विनाअट भरून देण्याची जबाबदारी माझी/आमची राहिल.

१५) एकाच दिवशी दिवसातून जास्तीत जास्त ३ वेळेस ए.टी.एम. कार्डचा वापर करता येईल. एका दिवशी जास्तीत जास्त रु. ३०,०००/- काढता येतील. किमान रक्कम रु. १००/- काढता येईल.

१६) एटीएम कार्डची सेवा नाकारणे, काही कालावधीसाठी स्थगिती करणे, रद्द करणेसाठी खालील परिस्थितीत बँक खातेदाराला पूर्व सूचना न देता एटीएम सेवा नाकारू शकते/ रद्द करू शकते किंवा काही कालावधीसाठी स्थगित करू शकते.

अ) एटीएम कार्डबाबतचे कोणत्याही एका किंवा अनेक नियमांचे / अटींचे पालन न केल्यास.

ब) करारातील कोणत्याही एका किंवा अनेक अटींचे उल्लंघन किंवा आश्वासनाचे पालन न केल्यास.

क) खातेदार दिवाळखोर झाल्यास/झाल्याचे समजल्यास.

ड) संयुक्त खातेदारापैकी कोणाही एका खातेदाराचा मृत्यू झाल्यास.

इ) खातेदाराची मानसिक अवस्था खालावल्यास/वेडा झाल्याचे कळल्यास.

फ) एटीएम कार्ड सवलतीचा गैरवापर होतो आहे असे बँकेच्या निदर्शनास आल्यास.

ह) एटीएम कार्डवरील डाटामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केल्यास, मॅग्नेटीक स्ट्रीपवर स्क्रॅच केल्यास किंवा कोणत्याही प्रकारे खराब केल्यास, एटीएम कार्डचा गैरवापर केल्यास बँक झालेले नुकसान खातेदाराकडून भरून घेईल आणि एटीएम कार्ड रद्द करेल.

१७) बँकेचा लीन Bank's Lien : खातेदाराच्या सध्याच्या, भविष्यातील ठेवी/ठेव खात्यावर एटीएम कार्ड सवलतीसाठी बँकेचा लीन (अग्रहक्क) राहील. एटीएम कार्डच्या व्यवहारातून झालेल्या ड्यूजसाठी खातेदाराचे खात्यावर, त्यांच्या संयुक्त खात्यावर बँकेचा लीन राहील आणि बँक आपली थकबाकीची रक्कम ह्या खात्याला नांवे टाकून वसूल करून घेवू शकते. ह्यासाठी खातेदाराला पूर्वसूचना देण्याची आवश्यकता असणार नाही.

१८) बँकेस एटीएम कार्डचे चार्जेस / फीस ठरविण्याचा, त्यात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार राहिल. बँक खातेदारांना पूर्व सूचना न देता त्यांची अंमलबजावणी करू शकते.

१९) एटीएम कार्डच्या संदर्भात बँकेने घालून दिलेल्या अटी, तसेच मी/आम्ही बँकेस दिलेले अधिकार कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही.

२०) Indemnification / नुकसान भरपाई संदर्भात :- एटीएम कार्ड धारकाच्या एखाद्या कृतीमुळे अथवा त्याच्याकडून झालेल्या नियमभंगामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांमुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे बँकेचा तोटा अथवा नुकसान झाल्यास कार्ड धारकाने त्याची भरपाई करून द्यावयाची आहे.

२१) ए.टी.एम. कार्ड व पिन क्रमांक शाखेतून जारी करण्यात येईल व संबंधितास सदर एटीएम कार्ड, धारकाची ओळख पटवून देण्यात येईल. त्यामुळे संबंधित अर्जकर्त्यावर शाखेतून घेऊन जाण्याची जबाबदारी राहील.

२२) पिन क्रमांकाचे पाकीट स्वीकारतांना ते पूर्णपणे सीलबंद असल्याची खात्री करूनच स्वीकारून पोंच द्यावी. नंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

२३) एका खातेदारास एकच एटीएम कार्ड देण्यात येईल. तसेच संयुक्त खातेदारांपैकी कोणाही एकाच खातेदाराच्या नावाने एटीएम कार्ड देण्यात येईल. खाते व्यवहार संयुक्तपणे असल्यास एटीएम कार्ड दिले जाणार नाही.

२४) भारतीय रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या KYC नॉर्मसचे पालन करणे बंधनकारक असल्यामुळे त्याचे पालन केल्याची खात्री केल्यानंतरच अर्ज स्वीकारण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

२५) खातेदार जर अज्ञान असेल तर किंवा संयुक्त खातेदार अज्ञान असेल तर अशा खातेदारांसाठी ए.टी.एम. कार्ड दिले जाणार नाही. वरील सर्व अटी/नियम मी/आम्ही वाचले असून ते मला/आम्हाला मान्य आहेत.

२६) एटीएम कार्ड धारकाचे बचत खाते, कोणत्याही कारणास्तव सिझ केले असल्यास/ खात्यावरील व्यवहार गोठविलेले असल्यास कार्ड धारकास पैसे काढता येणार नाहीत. अशा परिस्थितीत संबंधित शाखाधिकाऱ्याशी संपर्क साधणे गरजेचे राहील याची मला/आम्हाला जाणीव आहे.

दिनांक :      /      /          खातेदारांची नमुन्याप्रमाणे सही

१)

२)

३)

४)